# बाजीप्रभूचा
# पोवाडा

MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
POONA 5

लेखक

स्वातंत्र्यवीर

सावरकर

891.461 - SAV
0 5532
A|5532
891.461
Sav / Baj
.461
/ BAJ
532

एकमेव विक्रेते

## बलवन्त पुस्तक भाण्डार

गिरगांव मुंबई क्र. ४.

पुनरावृत्ति १९४६

मूल्य ८ आणे

प्र का श क
अनंत गोपाळ जोशी
झावबाची वाडी
चाळ क्र. २० (नवीन)
ठाकूरद्वार मुंबई २

सर्व हक्क लेखकाधीन

मु द्र क
विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगांव मुंबई ४.

# हिंदु–ध्वज–गीत.

अखिल–हिंदु–विजय–ध्वज हा । उभवुं या पुन्हां
ध्वज हा ॥ लढवुं या पुन्हां ॥ध्रु०॥

ह्या ध्वजासची त्या कालीं ।
रोंविती पराक्रमशाली ॥
रामचंद्र लंकेवरतीं वधुनि रावणा ।
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ १ ॥

करित जैं शिकंदर स्वारी ।
चंद्रगुप्त ग्रीकां मारी ॥
हिंदुकूश शिखरीं चढला जिंकुनी रणा ।
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ २ ॥

रक्षणीं ध्वजाच्या ह्याची ।
शालिवाहनानें साची ॥
उडविलीं शकांचीं छकलें समरिं त्या क्षणा ॥
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ ३ ॥

हाणिले हुसकितां जेथें ।
हूणांसि विक्रमादित्यें ॥
हाचि घुमवि मंदोसरच्या त्या रणांगणा ।
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ ४ ॥

जईं जईं हिंदु सम्राटें ।
अश्वमेध केले मोठे ॥
करित पुढति गेला । हाची विजय घोषणा ॥
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ ५ ॥

उगवूनि सूड हिंदूंचा ।
मद मर्दुनि मुस्लीमांचा ॥
शिवराय रायगडिं करिती वीर पूजना ।
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ ६ ॥

ध्वज हाचि धरुनि दिल्लीला ।
वीरबाहु भाऊ गेला ॥
मुसलमीन तक्ता फोडी हाणुनि घणा ।
ध्वज तो । लढवुं या पुन्हां ॥ ७ ॥

पुढति नेम कांहीं ढळला ।
ध्वज जरी करांतुनि गळला ॥
उचलुं या पुनरपि प्राणा लावुनी पणा ।
ध्वज हा । उभवुं या पुन्हां ॥ ८ ॥

**स्वातंत्र्यवीर सावरकर**

# प्रास्ताविक

**स्वातंत्र्यवीर सावरकर** यांचें तेजस्वी वाङ्मय बंधमुक्त झालें, हें आजच्या नि उद्यांच्या भारतीय तरुणांचें सद्भाग्य होय. तेजस्वी सावरकरसाहित्याचें प्रकाशन करण्याची उत्कट इच्छा फारा दिवसांपासून होती. ती इच्छा **स्वातंत्र्यवीर सावरकर** यांच्या आशीर्वादानें अल्पांशानें तरी पुरी होत आहे. सिंहगड नि बाजीप्रभू या पोवाड्यांचें प्रकाशन करण्याची संधि मला मिळाली हा माझा फारच मोठा गौरव झाला असें मी समजतों.

सिंहगडाचा पोवाडा १९०५ मध्यें **स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं** रचला. त्या वेळीं ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत असून त्यांचें वय लगभग वीस वर्षांचें होतें. ह्या सिंहगडच्या पोवाड्याचे दुसरेच वर्षी म्हणजे वयाच्या साधारणतः एकविसाव्या वर्षी 'बाजी देशपांडे' हा आपला दुसरा सुप्रसिद्ध पोवाडा त्यांनीं रचला.

त्या वेळेस म्हणजे चाळीस वर्षांपूर्वी 'स्वराज्य' हा शब्द Home Rule ह्या मर्यादित अर्थींहि वापरणें हा राजद्रोहाचा अपराध समजला जाई. ब्रिटिशांच्या राजकीय आधिपत्याखालीं नुसत्या घरगुती 'स्वराज्या'चे ध्येयाचाहि उच्चार किंवा प्रचार करण्यासाठीं श्रीमती ॲनी बेझंट किंवा लो० टिळक यांसारख्या नामवंत पुढाऱ्यांनासुद्धां राजद्रोहाच्या आरोपाखालीं कोर्टांत खेचलें गेलें. अशा काळीं 'स्वातंत्र्य' Absolute political Independence हें ध्येय पुढें ठेऊन त्याच्या प्राप्तीसाठीं

सशस्त्र क्रांति घडविणें हें अपरिहार्य साधन असल्यामुळें तशी क्रांति करण्याची प्रतिज्ञा केलेल्या **अभिनव भारत** ह्या–पुढें युरोप–अमेरिकेपर्यंत विस्तारलेल्या आणि गाजलेल्या-गुप्त संस्थेची स्थापना नाशिक येथें केली गेली. शक्यतों नैर्बंधिक कक्षेंत उघड प्रचार आणि उघड चळवळी करणारी '**मित्र-मेळा**' या नांवाची तिची एक प्रकट शाखा काढलेली होती. ह्या संस्थेच्या वतीनें लोकमान्यांनीं काढलेल्या शिवाजी उत्सव गणेशोत्सवप्रभृति सार्वजनिक चळवळींतून आपला स्वातंत्र्य-वादी नि सशस्त्र क्रांतिकारी उपदेश ऐतिहासिक नि पौराणिक प्रसंगांचे पडद्याखालीं, लोकांत फैलावण्यासाठीं '**मित्रमेळा**' ह्या नांवाचाच एक मेळाहि काढण्यांत आला. मेळ्यासाठीं **स्वातंत्र्यकवि गोविंद नि स्वतंत्र्यवीर सावरकर** हे संवाद, पद्यें नि पोवाडे रचीत. त्या मेळ्यासाठींच **सिंहगड** नि **बाजी देशपांडे** हे दोन पोवाडे **सावरकारांनीं** रचिले.

हे पोवाडे अगदीं पहिल्यांदां म्हणावयास निवडलेलीं पंधरा–सोळा वर्षांच्या आंतील 'मुलें'हि त्या पोवाड्यांप्रमाणेंच तेजस्वी होतीं. **दत्तू, श्रीधर** नि **बाळ** हीं त्यांचीं त्या वेळच्या त्या मंडळींतील आवडतीं नांवें. अभिनवभारताच्या बालशाखेंत हेच प्रमुख असत. हुतात्मा कर्वे नि देशपांडे हे ह्याच बालशाखेंतले. ह्या मुलांना त्या पोवाड्यांतील प्रत्येक शब्दाचें मर्म कळत असल्यामुळें आणि त्यांच्या हृदयांतच त्या पोवाड्यांतील स्वातंत्र्यस्फूर्तीची ज्योत धगधगत असल्यामुळें त्यांच्या तोंडून गायिले जात असतां ते पोवाडे अधिकच परिणामकारक ठरत. या मुलांना अभिनय स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकर शिकवीत; आणि चाल बसवून घेऊन त्यांना साथ देणारे पटाईत तबलजी असत स्वतः आबाकवि गोविंद ! सन १९०५–०६ च्या शिवाजी नि गणेश उत्सवांत हे पोवाडे नाशिकडे जेव्हां प्रथम म्हटले गेले तेव्हां त्यांची ख्याति त्या प्रांतांत बोलबोलतां झाली. साहित्याच्या शस्त्रागारां-तून सूचना, लक्षणा, ध्वनि, व्यंग इत्यादि मार्गणांचा अचूक नि अमोघ मारा करणारे हे पोवाडे, त्यांना ऐकणाऱ्या सहस्त्रा-वधि लोकांच्या मनांत प्रस्तुत पारतंत्र्याविषयींची तीव्र चीड आणि त्याच्या शृंखला तोडून टाकण्याची ईर्षा उत्पन्न करीत. थोड्याच दिवसांत या मेळ्याचा लौकिक पुण्यापर्यंत पोहोंचून, सावरकरांच्या विचारें सुप्रसिद्ध काळकर्ते कै. परांजपे ह्यांनीं त्या मेळ्यास पुण्यास बोलाविलें. तेथील शिवजयंत्युत्सवांत नि गणेशोत्सवांत हे पोवाडे इतके लोकप्रिय झाले कीं, गायकवाडवाड्यांतील गणपतीसमोर ह्या मेळ्यास लोकमान्य टिळकांकडूनहि स्वागतिण्यांत आलें. श्रोत्यांचे मोठमोठे जमाव त्यांच्या कार्यक्रमांस लोटत आणि त्या त्या वेळीं एक नवीन, जाज्वल्य संदेश मिळावा, एक नवें तेज तळपावें असा त्या जनसंमर्दावर त्यांचा प्रभाव पडत असे. हे पोवाडे नि पद्यें प्रथम म्हणणारीं तीन मुलें म्हणजेच पुढें प्रसिद्धीस आलेले कै. प्रा. दत्तोपंत केतकर, श्रीधरपंत वर्तक, विधिज्ञ ( वकील ) आणि डॉ. नारायणराव सावरकर हे होत. पुढें अभिनवभारताच्या गुप्त संस्थेच्या शाखोपखांवर जेव्हां परकीय सरकारनें आग पाखडली तेव्हां ह्या तिघांहि तरुणांना राजकीय आपत्तींना नि छळांना तोंड द्यावें लागलें.

या पोवाड्यांच्या तेजस्वी परिणामाविषयीं ते जप्त होण्यापूर्वीची आणखी एक आठवण सांगण्यासारखी आहे. या काळींच लोकमान्य टिळकांनीं प्रत्यक्ष रायगडावर शिवोत्सव साजरा करण्यास आरंभिलें. त्या उत्सवाचे वेळीं महाराष्ट्रांतील प्रमुख कार्यकर्त्यांप्रमाणें शतावधि मावळ्यांचा जमावहि गडावर जमे. मुंबईचे प्रख्यात वकील नि टिळकपक्षीय पुढारी श्री. दाजी आबाजी खरे हे ह्या उत्सवाचे अध्यक्ष म्हणून लो. टिळक नि काळकर्ते परांजपे यांचेसह रायगडावर आले होते. त्यांच्या अध्यक्षतेखालीं ह्या पोवाड्यांचा कार्यक्रम जेव्हां चालू झाला तेव्हां त्यांतील त्यावेळीं अपूर्व नि अतिशय 'जहाल' वाटणारे विचार प्रथमच ऐकल्यामुळें श्री. खऱ्यांसारख्या तोलून तोलून पाऊल टाकणाऱ्या पुढाऱ्याला हें नसतें संकट आपण अध्यक्ष असतां ओढवून घेणें बरें नव्हे असें वाटून ते चुळबुळूं लागले. इतक्यांत 'बाजी देशपांड्या'चा पोवाडा चालू झाला. त्याचें पहिलेंच तेजस्वी कडवें रंगत रंगत जेव्हां त्या कडव्याचा शेवटचा चरण 'तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला' हा म्हटला जाऊं लागला तेव्हां तेथें जमलेल्या अभिनवभारताच्या अनेक गुप्त क्रांतिकारकांसहच ते शतावधि मावळेहि उद्दीपित होऊन चारी बाजूनें हरहर महादेवाच्या गर्जना उठूं लागल्या. तेव्हां श्री. खरे हे आपण यापुढें अध्यक्षपदीं राहून लोकांच्या ह्या अमर्याद नि अनैबंधिक ( बेकायदा ) वर्तनाचें दायित्व घेऊं इच्छित नाहीं; तरी कार्यक्रम बंद करावा असें लोकमान्यांना सांगूं लागले. तेव्हां लोकमान्यांनीं पानावर पान ठेवून सभेस सांगितलें कीं, अध्यक्षांना प्रवासाचा शीण झालेला आहे, तेव्हां आम्हीं दोघे जातों. या पुढें परांजप्यांचे अध्यक्षतेखालीं सभा चालेल. लोकमान्य त्यांना घेऊन गेले. परंतु काळकर्त्यांनीं अध्यक्षपणाचें दायित्व पत्करून कार्यक्रम तसाच पुढें चालविला.

सन १९०६ च्या आगेमागें हे पोवाडे बाबाराव सावरकर यांनीं छापले. साऱ्या महाराष्ट्रांत सहस्रावधि स्त्री-पुरुषांच्या नि अबाल-वृद्धांच्या तोंडीं ते रुळूं लागले. त्यांची मात्राशुद्ध नि उत्तेजक चालसुद्धां इतकी लोकप्रिय झाली कीं, पुढें अनेक वर्षें 'सिंहगडची चाल' म्हणजे पोवाड्याची चाल असें समीकरण ठरलें. जेव्हां लवकरच अभिनवभारताच्या सर्वच क्रांतिकारक प्रकाशनांची ब्रिटिशांच्या क्रोधाग्नींत होळी झाली तेव्हां हे दोन पोवाडेहि सन १९०९ च्या आगेमागें जप्त करण्यांत आले.

ही जप्ति इतकी कडक होती कीं हे पोवाडे कुठेंहि तोंडीं म्हटले तरी म्हणणाऱ्यांना शिक्षा होई. उलट लोकहि त्यांच्या हस्तलिखित प्रती करून घरोघर एखाद्या मूल्यवान ठेव्याप्रमाणें रक्षूं लागले. प्रांताप्रांतांतून जेव्हां झडत्यांचीं सत्रेंच सारखीं सुरू होतीं तेव्हां अभिनवभारतवाङ्मयाचें असें एखादें लिहिलेलें वा छापलेलें पानसुद्धां घरीं सांपडलें तरी क्रांतिकारक कटांत ते गृहस्थ समाविष्ट असल्याचा तो एक प्रबळ पुरवाच मानला जाई. परंतु असे खडतर छळ सोसूनहि जनतेनें हें वाङ्मय जिवंत ठेवलें. शतावधि मातापितरांनीं आपल्या मुलांमुलींकडून हे पोवाडे पाठ करून घेतले. धार्मिक समारंभांत, गृह्य मंगल कार्यांत, शाळा-कॉलेजांतील संमेलनांत हे पोवाडे अंतस्थ

रीतीनें म्हटले जात. पुन्हां पुन्हां गुप्तपणें त्यांच्या लेखी प्रती केल्या जात; इतकेंच नव्हे तर पुन्हा पुन्हा गुप्तपणें ते छापलेहि जात. पिढीमागून पिढीनें अशा एक-निष्ठ आस्थेनें नि धैर्यानें आज सतत चाळीस वर्षे हे जप्त झालेले पोवाडे जिवंत ठेवले आहेत. आजहि सहस्रावधि स्त्रीपुरुषांना ते तोंडपाठ झालेले आहेत.

मुद्रणाच्या किंवा लेखनाच्या अभावीं लोकांच्या जिभेवरच जिवंत राहतें तें खरें लोकगीत. लोकांच्या आकांक्षांचा नि भावनांचा सहज उच्चार! त्यांतहि तें काव्य असें जिभेवर जिवंत ठेवणें हा परकीय राजसत्तेकडून जेव्हां दंडनीय अपराध ठरविला जातो, त्यासाठीं शिक्षा भोगाव्या लागतात तेव्हांहि जें काव्य वा साहित्य पिढ्यानुपिढ्या लोकांच्या जिभेवर जिवंत राहातें तें काव्य किंवा साहित्य लोकांच्या आकांक्षांचा नि भावनांचा केवळ उच्चारच नसून त्यांच्या जीवनाशीं तें समरस झालेलें असतें म्हणूनच तें जगतें. असें जगण्याचा मान ज्या वाङ्मयास मिळाला आहे त्यांत ह्या पोवाड्यांची गणना होते.

त्यांचेवरील जप्ति उठवण्यासाठीं सरकारी आज्ञेचा उघड उघड भंग करून अनेक वेळीं लोकांनीं प्रकट सभांतूनहि हे पोवाडे म्हटले. अशाच एका सभेंत साहित्यसम्राट श्री. तात्याराव केळकर यांनींहि ' सिंहगड 'च्या पोवाड्याचे चरण प्रकटपणें म्हणून दाखविले आहेत.

परंतु ब्रिटिश सरकार तर काय पण गेल्या काँग्रेस मंत्रिमंडानें-सुद्धां अशा तेजस्वी सावरकरवाङ्मयावरील बंदी उठविली नाहीं. कारण काय? तर त्याला म्हणे हिंसेचा वास येतो!

परंतु लोकांचा निग्रहहि वर लिहिल्याप्रमाणें पराकोटीस गेल्यामुळें व १९४२ च्या चळवळीपासून अहिंसेचा अडसर जनतेनें उडवून दिल्यामुळें आज उण्यापुऱ्या चाळीस वर्षांनंतर या दोन्ही पोवाड्यांवरील आणि एकंदर ' सावरकरवाङ्मया-वरील बंदी आजच्या काँग्रेस मंत्रिमंडळाला उठवावी लागली. अनेक वर्षांच्या अज्ञातवासानंतर, स्वातंत्र्योत्सुख भारतीय तरुणांना सावरकर साहित्यांतून घेण्याची संधि आजच्या काँग्रेस मंत्रिमंडळानें दिली याबद्दल काँग्रेस मंत्रिमंडळास मी मनःपूर्वक अभिनंदितो.

**प्रकाशक**

---


# गिरगांवांत माधवबाग !

## सर्व प्रकारचीं पुस्तकें मिळण्याचें प्रमुख ठिकाण

## श्री. परचुरे यांचें

# बलवन्त पुस्तक भाण्डार

**पोर्तुगीज चर्च जवळ गिरगांव, मुंबई क्र. ४**

# बाजी प्रभूचा पोवाडा

जयोस्तु ते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे ।
स्वतंत्रते भगवति त्वामहम् यशोयुतां वंदे ॥ १ ॥
स्वतंत्रते भगवती या तुम्ही प्रथम सभेमाजीं ।
आम्ही गातसों श्रीबाजीचा पोवाडा आजीं ॥ २ ॥
चितूरगडिंच्या बुरुजांनो त्या जोहारासह या ।
प्रतापसिंहा प्रथित विक्रमा या हो या समया ॥ ३ ॥
तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा येई ।
निगा रखो महाराज रायगड की दौलत आयी ॥ ४ ॥
जरिपटका तोलीत धनाजी संताजी या या ।
दिल्लीच्या तक्ताचीं छकलें उधळित भाऊ या ॥ ५ ॥
स्वतंत्रतेच्या रणांत मरुनी चिरंजीव झाले ।
या ते तुम्ही राष्ट्रवीरवर या हो या सारे ॥ ६ ॥

चालः—घटदाट सभा थाटली
गर्जना उठली
घोर त्या कालीं
जय छत्रपतींचा बोला
जय स्वतंत्रतेचा बोला
जय भवानिकी जय बोला

तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला ।
चला घालुं स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी घाला ॥ १ ॥
हर हर गर्जुनि वीर मावळे सर्व सज्ज असती ।
परंतु कोठें चुकले बाजी यांत कां न दिसती ॥ १ ॥
हाय हाय तो म्लेंछासंगें घडित बसे साची ।
स्वदेशभूच्या पायासाठीं बेडी दास्याची ॥ २ ॥
ऐकुनियां शिवहृदय हळहळे म्हणे दूत हो जा ।
बोधुनि वळवा वीर बाजि तो तुम्ही राष्ट्रकाजा ॥ ३ ॥

चालः—शिवदूत तेधवां जाती
बाजिला वदती
सोडरे कुमती
कां म्लेंछ कसाई भजसी
कां दास्य—नरकिं तूं पचसी
कां जिर्णें तुच्छ हें नेसी

स्वदेश नाहीं, स्वराज्य नाहीं, धिक् या देहाला ।
चला घालुं ॥ २ ॥

बाजीराया म्लेंछ सबळ हा दोष न काळाचा ।
ना देवाचा ना धर्माचा किंवा नशिबाचा ॥ १ ॥
देशद्रोही चांडाळांचा भरला बाजार ।
गुलामगिरि जे देती त्यासी निष्ठा विकणार ॥ २ ॥
तुम्हीच ना स्वातंत्र्य चिरियलें या पोटासाठीं ।
तुम्हीच ना रे भूमातेच्या नख दिधलें कंठीं ॥ ३ ॥

चाल:—हो सावध बाजीराया
दास्यि कां काया
झिजविशी वाया
तुज भगवान् श्री शिवराजा
स्वातंत्र्य प्राप्तिच्या काजा
बोलावी तिकडे जा जा
देशभक्तिची सुधा पिउनि घे प्रायश्चित्ताला ।
चला घालुं ॥ ३ ॥

शिवदूताचे बोल ऐकतां बाजी मनिं वदला ।
काळसर्प मी कसा उराशीं मित्र म्हणुनि धरिला ॥ १ ॥
घरांत शिरला चोर तया मीं मानुनिया राजा ।
बंड बोलिलों शिवरायाच्या परमपूत काजा ॥ २ ॥
माता माझी कष्टविली मी राजनिष्ठ त्यासी ।
या पाप्यानें युद्ध मांडिलें देशरक्षकांशीं ॥ ३ ॥

चाल:—जा सांगा शिवभूपाला
अशा अधमाला
राजनिष्ठाला
त्वां आधीं शतधा चिरणें
तुज करवीं घडतां मरणें
पावेन शुद्धि मग माने
तुझ्या करींच्या तरवारीच्या वेइन जन्माला ।
चाल घालुं ॥ ४ ॥

देशभूमिच्या कसायासि कां इमान मी देऊं ॥
भाकरि देतो म्हणुनि तयाच्या चाकरीस राहूं ॥ १ ॥
कवणाची भाकरी बंधु हो चाकरि कवणाची ।
भाकर दे भूमाता चाकरि तिच्या घातकांची ॥ २ ॥
राज्य हिसकलें देश जिंकला त्या पर अधमाशीं ।
राजनिष्ठ मी राहुनि कवण्या साधित नरकासीं ॥ ३ ॥

चाल:—ही गुलामगिरिची गीता
राजनिष्ठता
ह्यापुढें आतां
मद्देशची माझा राजा
तो प्राण देव तो माझा
मी शरण शिवा सांगा जा
राख उडाली प्रदीप्त बाजी वैश्वानल ठेला ।
चला घालुं ॥ ५ ॥

लोट धुळीचा सुटला अवचित दीन शब्द उठला ।
लगट करुनि शिद्दिनें पन्हाळा गड वेढुनि धरिला ॥१॥
लक्ष्मीचें मृदु कमल शारदा सुंदरिचा वीणा ।
स्वतंत्रतेचा कलिजा अडके गडांत शिवराणा ॥ २ ॥
अफझुल्याच्या वधा स्मरोनी फाजल सुत त्याचा ।
करितो पण कीं शिवभूपाला जिवंत धरण्याचा ॥ ३ ॥

चाल:—बापासि तुझ्या जो खडे
चारि रोकडे

जाशि त्याकडे
जीवंत धरूं तरि साचा
जीवंत पवन धरण्याचा
अभ्यास आधिं कर याचा
खुशाल हरिणा मग तूं धावें धरण्या वणव्याला ।
चला घालुं ॥ ६ ॥

बाजि लागला शिवभूपाच्या थोडा कानाला ।
हातीं भाला एक मावळा गडाखालिं आला ॥ १ ॥
शिद्दि पाहतां चुकुनि हात तरवारीला गेला ।
दाबुनि त्याला मुजरा केला धीट नीट वदला ॥ २ ॥
शिवाजि राजा जिवंत येतो तुमच्या गोटाला ।
उद्या सकाळीं करुं गड खालीं कळवी तुम्हांला ॥ ३ ॥

चाल:—ऐकुनी शिद्दि बहु फुगला
रिपूजन भुलला
परस्पर वदला
अजि खान, खानखानाजी
हुए शिकस्त मराठे हैं जी
फिर लढना क्यौं कर आजी
चलो शराब उडाये ताजी
आप लेवजी, नहिं आप लेवजी
आप गाजि आप तो रण गाजी

झिंगविला अरि सर्प फुंकुनी पुंगी गुंगविला ।
चला घालुं ॥ ७ ॥

गुंगवोनि अरि सर्प शिवा गारोडि गडावरि तो ।
प्रहर रात्र उलटतां मराठी जादू मग करितो ॥ १ ॥
कृष्णपक्षिच्या काळ्या काळ्या रात्रीं त्या दडल्या ।
गर्द झाडिला भिऊनि चांदण्या बाहेरि न पडल्या ॥ २ ॥
अशा तमीं किलकिलें दार का तटावरी झालें ।
बाजि निघाले श्री शिव आले आले शत भाले ॥ ३ ॥
भाला खांद्यावरी मराठा घोड्यावरि स्वारी ।
भरतां घोडा थै थै नाचे तोंचि शीळ झाली ॥ ४ ॥

चाल:—वीर हो टाच घोड्याला
बाण हा सुटला
हटविणें त्याला
रिपु तुडवित व्हा व्हा पार
चौक्यासि तुम्हा दावील
काजवा चोर कंदील
गेला गडतळ गेला सत्तर मैल भूप आला ।
चला घालुं ॥ ८ ॥

तुरी शिद्दिच्या हातीं देवुनि सुटता शिवनृपती ।
अब्रह्मण्यम् कितिक भावडीं भोळिं भटें वदती ॥ १ ॥
अब्रह्मण्यम् यांत कायरे दोष कोणता तो ।
आला ठक ठकवाया उलटा भला ठकविला तो ॥ २ ॥

साप विखारी देश जननिला ये ध्याया चावा ।
अवचित गांठुनि फसवुनि भुलवुनि असाच ठेचावा ॥३॥

चाल :- ये यथा प्रपद्यंते माम्
भजाम्यहं ताम्
तथैव धीमान्
भारतीं कृष्ण वदला हें
अधमासि अधम या न्यायें
रक्षिलें राष्ट्र शिवरायें

राष्ट्ररक्षका सावध हो रिपु हुडाकित तुज आला ।
चला घालुं ॥ ९ ॥

हात जोडितों पाया पडतों बाजि तुझ्या राया ।
गड अवघड रांगणा तिथें तुम्ही जाणें या समया ॥१॥

राष्ट्रदेवीचा हस्त कुशल तूं तरि लाखों भाले ।
अम्हासारिखे मिळतील चिरतिल चरचर रिपु सारे ॥२॥

जाऊं काय मी बाजि मृत्युमुखिं ढकलुनि तुम्हाला ।
कधीं शिवा जातिचा मराठा मृत्यूला भ्याला ॥ ३ ॥

चढा गड तुम्ही यशोदायिनी तोफा पांच करा ।
तोंवरि लढवूं गनीम अडवूं खिंड करूं निकरा ॥ ४ ॥

चाल:—वसुदेव तूंचि शिवराया
कंस कपटा या
करुनियां वाया
स्वातंत्र्य कृष्ण चिन्मूर्ती
जा घेउनि अपुल्या हातीं
गड गोकुळांत नांदो ती

गडीं चालला शिव तो खिंडित दीन शब्द उठला ।
चला घालुं ॥ १० ॥

आले आले गनीम खिंडित चवताळुनि आले ।
झाले झाले सज्ज मराठे सरसावुनि भाले ॥ १ ॥

संख्या दुप्पट रिपुची, परि ते निकरानें लढती ।
हरहर गर्जुनि समर रंगणीं तुटोनियां पडती ॥ २ ॥

खड्गांचे खणखणाट त्या माधिं शर सणसण येती ।
मारण मरणावीण नेणती वीर रणीं रंगती ॥ ३ ॥

चाल:—तो हर हर एकचि झाला
वदति रे चला
म्लेंछ हा हटला
चला चढवा नेटाचा हल्ला
वीरश्रीचा करा रे हल्ला
निकराचा चालु द्या हल्ला

मारित हाणित हटवित म्लेंछा खिंडिपार केला ।
चला घालुं ॥ १ ॥

म्लेंछ हटवितां बाजी वळुनी गडाकडे पाहे ।
श्री शिव चाले मार्ग बघुनियां वीर गर्जताहे ॥ १ ॥

गडांत जाईल राष्ट्रदेविचा जिवलग शिवराणा ।
तोंवरि लढवूं खिड शूर हो हा अपुला बाणा ॥ २ ॥
त्या बाण्याच्या आधिं रणांगणिं जरी घडे मरणें ।
पुनर्जन्म घेउनी तत्क्षणीं पुनः पुन्हा लढणें ॥ ३ ॥

चाल:—रघुराया रावण हरणा
कंसमर्दना
भो जनार्दना
लाडक्या देश जननीचे
स्वातंत्र्य रक्षणीं साचे
हे प्राण दान जरि अमुचे
पवित्र हे जरि त्वत्प्रिय हे जरि दे तरी सुयशाला ।
चला घालुं० ॥ १२ ॥

आले आले गनीम चालुनि पुनरपि तों आले ।
झाले झाले सज्ज पुनरपी उठावले भाले ॥ १ ॥
दीन दीन रण शब्दा हर हर महादेव भिडला ।
भिडला ओष्ठीं दंत मस्तकीं खड्ग वक्षिं भाला ॥ २ ॥
हल्ला चढवित परस्परावरि पुनः पुन्हा लढती ।
नटती योद्धे समरभाजनीं वीररसा लुटिती ॥ ३ ॥

चाल:—कचरला मराठी भाला
बाजि तो आला
तोलुनी धरिला
रणिं रंग पुन्हा ये साचा
गर्जती मराठे रिपुचा
घ्या सूड म्लेंछ मत्तांचा
उगवावा सूड देशाचा
आणि सूड स्वातंत्र्याचा
भोसका कट्यारी बरच्या
करा माळा रिपुच्या आंतड्याच्या
लावा उट्या त्यांच्या रक्ताच्या
त्याचा मस्तक चेंडू साचा
समर रंगणीं चेंडुफळीचा डाव भरा आला ।
चला घालुं० ॥ १३ ॥

डाव उलटला म्लेंछावरी तो पुन्हा परत हटला ॥
जय झाला परि वीर मराठा बहुतांशीं पडला ॥ १ ॥
तिकडे गडिंच्या तोफा अजुनी पांच कां न सुटती ।
वीर मराठे सचिंत आशाबद्ध सर्व बघती ॥ २ ॥
तशांत घेउनि ताजी टोळी फाजलखां येतो ।
धन्य बाजिची ! पुन्हा उसळुनी अशनी सम पडतो ॥३॥
खिड तोफ तिज मधुनी सुटला गोळा श्री बाजी ।
रणीं तळपतो वीरश्रीचा रणनवरा बाजी ॥ ४ ॥

चाल:—तों गोळी सूं सूं आली
अहो त्या काळीं
मर्मी ती घुसली
श्री बाजी विव्हळ पडला

मागुती कांहिंसा उठला
बेहोष वीर परि वदला
तोफे आधीं न मरे बाजी सांगा मृत्यूला ।
चला घालुं ॥ १४ ॥

थांबा बाजी जखम तरि पुरी बांधूं द्या थांबा ।
हर हर रणिंचा ऐकुनि वीरा उसळुं नका थांबा ॥ १ ॥
जखम कुठेरे असे फक्त मी तृषाक्रांत थोडा ।
रिपु-रक्तातें पितो घटघटां सोडा मज सोडा ॥ २ ॥
खरी जखम भू—आइस माझ्या, फोडी हंबरडा ।
ओढुनि अरिची अंतडी बांधुया पट्टि तिला सोडा ॥३॥
भले मराठे लढा तसेची आलो मी सोडा ।
प्रखर आपुली भूक शमविण्या रिपु नरडी फोडा ।

चालः—होईल तोफ शिवबाची
क्षणीं दो क्षणिंची
तोंवरी खिंड लढवाची
फेडाया ऋण या भूचें
अजि उष्ण बिंदु रक्ताचे
द्या मुद्दल मोजुनि साचें
व्याज तिला स्वातंत्र्य देउनी फेडा कर्जाला ।
चला घालुं ॥ १५ ॥

काय वाजले ? बाजीराया बार न गर्डि झाला ।
शिला कोसळे पान सळसळे पक्षी ओरडला ॥ १ ॥

चाल.— श्री स्वतंत्रता भगवती [illegible]

बाजिला नेती

आपुल्या रथीं

गंधर्व तनन तैं करिती

दुंदुभी नभीं दुमदुमती

श्री बाजी स्वर्गा जाती

करी चराचर विश्व बाजिच्या जयजयकाराला ।

चला घालुं ॥ १७ ॥

चला मराठे रणीं पहुडले जे आणिक सुर ते ।
पावन खिंडित बसून तीसह जाति नभः पंथें ॥ १ ॥
श्री बाजीचें रक्त पेरिलें खिंडित त्या काळा ।
म्हणुनि रायगडिं स्वातंत्र्याचा थोर वृक्ष झाला ॥ २ ॥
अहो बंधु हो पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी ।
स्वतंत्र त्या पूर्वजां शोभता वंशज का आजी ॥ ३ ॥
विनवि विनायक समजुनि घ्यावें यांतिल अर्थाला ।
चला घालुं स्वातंत्र्यसंगरिं रिपूवरी घाला ॥ ४ ॥
स्वदेश नाहीं स्वराज्य नाहीं धिक् या देहाला ।
चला घालं स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी हल्ला ॥ ५ ॥

---

891.461 - SAV
0 5532
891
SAV
0 5
STOCK-VERIFIED
JUNE-2011
98-2000
H15532
Stock Verified
1996-97